महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपुर

## GOVT. MEDICAL COLLEGE & SUPER SPECIALITY HOSPTAL , NAGPUR ( M.S)

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटल जवळ, हनुमान नगर, नागपुर-४४०००९

Email :- gmcssh95@gmail.com Ph No. 0712- 2741056

जा.क्रं.शावैमवअविरुना/बांधकाम विभाग/ 1453 /2025 दि. 13 /03/2025

**Quotation**

**दरपत्रक सुचना**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपुर या संस्थेच्या परिसरातील "सी" विंग इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या, विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे करिता इच्छूक लिलावदारांचे सहभागाकरिता सदर सुचना प्रसिध्द करण्यात येत असुन त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**प्रस्तावित "सी" विंग इमारतीच्या जागेमध्ये असलेली झाडे - ७४ नग**

**वरिल कामाचे विवरणपत्र सोबत जोडलेले असुन, या रकमेपेक्षा कमी किंमतीचे देयकार स्विकारण्यात येणार नाही.**

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपुर या संस्थेच्या परिसरामध्ये उभी असलेली झाडे यांना दर लागू राहील. दरपत्रके www.gmcnagpur.org/tenders या संकेतस्थळावर उपलब्ध असुन सदर दरपत्रके या कार्यालयातील बांधकाम विभागास सादर करावी.

२. इच्छूक दरपत्रकदारकाचे दस्तावेज व अन्य बाबतची पडताळणी संस्थेतील समितीकडून करुन त्यांना सहभागी होणेसाठी पात्र करण्यात येईल.

३. इच्छूक लिलावदारांनी दि.१३/०३/२०२५ ते दि.१८/०३/२०२५ (वेळ १७.००) या कालावधीत आवश्यक बाबींची पुर्तता करुन विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे. यांची किंमत संपुर्ण माहितीसह दरपत्रकामध्ये सादर करावे. तसेच झाडे कापण्याचा दर जीएसटीसह इत्यादी आकारणी व अधिभारासहित दरपत्रकामध्ये नमूद करणे. दरपत्रके या कार्यालयात सादर करावे. उशिरा प्राप्त झालेले कोटेशन स्विकारण्यात येणार नाही.

४. उक्त नमूद कालावधीच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दरपत्रकाव्दारे विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे लिलावदार यांना पाहण्याची मुभा आहे.

५. दरपत्रकामध्ये जे लिलावदार H-१ मुल्यांकन दराच्या वर राहील. त्यांना झाडे उचल करण्यापुर्वी आदेशातील अटी व शर्ती लागु राहतील. तसेच मंजुर करण्यात आलेल्या निविदाकारास रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल.

६. ज्या दरपत्रकदारकाचे स्विकृती नंतर त्वरित कामास उपविभागीय अभियंता सा.बा.वि.क्रं.५ नागपुर यांच्या निदर्शनाखाली झाडे कापणे व उचल करणे याची सुरवात करावी लागेल. संपूर्ण झाडे कापणे व उचल करण्याचे काम १५ दिवसात पूर्ण करावे लागेल. सदर कामास विलंब झाल्यास प्रतिदिवस रु.५००/- प्रमाणे क्षतिपूर्ती आकारण्यात येईल.

७. संस्थेत असलेल्या विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे या लिलावाबाबत मागविण्यात येत असलेल्या दरपत्रके रद्द करण्याचा अथवा यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, शावैमवअविरु नागपुर यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

(डॉ. राज गजभिये)<br>
अधिष्ठाता<br>
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व<br>
अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपुर.

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 वा माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-400001
Email-gardendept.nmc@gmail.com


949
06/2/25

क्रमांक :- NMC/OWL/GRDN/2024-25/..38126 दिनांक 04/02/2025

प्रति,

मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर

**विषय** :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालय प्रस्तावित नविन "सी" विंग इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या झाडास जमिनिपासून कापणी करण्याबाबत.

**संदर्भ** :- कार्यालयास प्राप्त आपले दिनांक 19.09.2024 च्या पत्रान्वये.

वरील पत्रान्वये मोक्यावर जाऊन झाडाची/ झाडांची पाहणी करून झाडाच्या/झाडांच्या स्थितीचे निरीक्षण केले असता -

**मा. प्रशासक तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, म.न.पा. नागपूर यांनी दिनांक** 24.01.2025 **ला दिलेल्या मंजुरी अन्वये,** आपणास खालील झाडे कापणी करण्यास खालील अटींवर परवानगी देण्यात येते.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालय येथील प्रस्तावित नविन "सी" विंग इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरिटेज) सुबाभूळ-1, रेनट्री-2, केशिया-1, बाभूळ-2, चिचबिलाई-1 व नॉन हेरीटेज सुबाभूळ-30, जंगली करंजी-5, सप्तपर्णी-5, रेनट्री-2, केशिया-7, बाभूळ-10, सिसम-2, कडूनिम-2, आडजात-1, चिंच-1, काटसावर-1, पळस-1 अशी एकुण** (7+67=74) 74 **नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याची आपणास परवानगी देण्यात येत आहे.**

1. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे / झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.
2. आपणास झाड/झाडे/झाडांच्या कापणी /फांद्या स्वखर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर कापणी/छाटणी कराव्या लागतील. झाड/झाडे/ कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
3. तोडण्यात येणाऱ्या 74 नग झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुले 16, 2021/आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट—कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याच जातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या **वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 2035 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेच लागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**
4. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.
5. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**
6. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.
7. परवानगी देऊनही झाडास कापणी किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.

**टिप** :- अ) झाडे तोडण्याकरिता महानगरपालिकेचे अधिकृत ठेकेदार नसून कोणत्याही ठेकेदारास झाडे तोडण्याचा परवाना दिलेला नाही.

ब) नविन झाड / झाडे लागवड केल्यानंतर झाडांची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ठ "अ" व "ब" मध्ये भरून कार्यालयास सादर करावा. तसेच झाडाच्या / झाडांच्या फांद्या तोडल्यानंतर एक महिन्याच्या आत कार्यालयास लेखी स्वरुपात परिशिष्ठ "अ" नुसार कळवावे. अन्यथा डिपॉझीट रक्कम परत केल्या जाणार नाही.

बांधकाम
5/2/25

वृक्ष संवर्धक
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी** :- 1) वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.
2) श्रीमती. वर्षा वृशे, कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (वै.), सा. बां विभाग, नागपूर.